**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:09.02.2025** **वार : रविवार**

---

**ठळक बातम्या**

- दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाला स्पष्ट बहुमत; अरविंद केजरीवाल, मनिष सिसोदिया यांचा पराभव.

- विधिमंडळात कायदे करताना तळागाळातील व्यक्तीच्या आकांक्षा प्रतिबिंबित झाल्या पाहिजेत – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.

- ज्येष्ठ पत्रकार, पंढरीनाथ सावंत अनंतात विलीन.

**आणि**

- भारत आणि इंग्लंड यांच्यात आज दुसरा एकदिवसीय क्रिकेट सामना कटक इथं.

**दिल्ली विधान सभा**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. 27 वर्षांनी भाजपाला सत्ता मिळाल्याचा आनंद असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते काल पुण्यात पत्रकारांशी बोलत होते. दिल्लीकरांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास दाखवला असून अरविंद केजरीवाल यांचा बुरखा फाडला आहे असं सांगताना भाजपा लोकांच्या अपेक्षा पूर्ण करेल असंही फडणवीस यावेळी म्हणाले. दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेल्या 48 जागांच्या यशातून एन डी ए सरकारच्या विकास आणि सुशासनाची हमी दिसून येत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विजयानंतर म्हटलं आहे. ते काल नवी दिल्ली इथं पक्षाच्या मुख्यालयात बोलत होते. दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपला मिळालेल्या 48 जागा या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर दिल्लीकरांनी व्यक्त केलेल्या विश्वासाच्या प्रतिक असून देशाच्या राजधानीचं सर्वांगसुंदर शहर हे दिल्लीकरांचं स्वप्न पूर्ण होईल," असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.दिल्ली विधानसभेत भाजप 48 तर आम आदमी पक्षाला 22 जागा मिळाल्या आहेत. काँग्रेस सलग तिसऱ्यांदा 'शून्या' वर राहिली आहे. तर दिल्लीतील जनादेश नम्रतेने स्वीकारत असल्याचं काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. दिल्लीमधील प्रदूषण, महागाई आणि भ्रष्टाचाराविरुद्धची लढाई सुरूच राहील असंही त्यांनी म्हटलं आहे. तर आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनीही पराभव मान्य करत असल्याचं म्हटलं आहे.

**छात्रसंसद**

विधिमंडळात कायदे करताना तळागाळातील व्यक्तीच्या आकांक्षा प्रतिबिंबित झाल्या पाहिजेत, तसेच जनतेशी संवाद आणि विधिमंडळाचे कामकाज यामध्ये संतुलन ठेवले पाहिजे,' अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देशभरातील सर्वपक्षीय आमदारांकडे व्यक्त केली. पुण्यातील एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटच्यावतीने आयोजित 14 व्या भारतीय छात्र संसदेच्या देशभरातील आमदारांसाठी दोन दिवसीय- क्षमता वृद्धी कार्यक्रम पुण्यात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून फडणवीस बोलत होते. लोकसभेच्या माजी अध्यक्षा सुमित्रा महाजन, राज्याच्या विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उत्तर प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष सतीश महाना, झारखंड विधानसभेचे अध्यक्ष रवींद्रनाथ महातो आदि यावेळी उपस्थित होते.

या संमेलनात देशभरातून आलेल्या विविध राजकीय पक्षांच्या 200 पेक्षा अधिक आमदारांनी सहभाग घेतला आहे.

**मोहोळ**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नवीन टर्मिनलवर 'डिजियात्रा' या चेक इन प्रणालीचे लोकार्पण केंद्रीय नागरी हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते काल करण्यात आलं. डिजियात्रा' सुरु झाल्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून विमानतळाच्या प्रवेशद्वारापासून तर विमानात बसेपर्यंतची प्रक्रिया सुलभ, सहज आणि सोपी झाली आहे. यामुळे प्रवाशांच्या रांगा टळणार असून वेळेची बतच होणार आहे.

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.......

**पालघर** जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील बोर्डी इथं काल 2 दिवसीय 'चिकू महोत्सव 2025' या कार्यक्रमाचे उद्घाटन मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते झालं. या माध्यमातून चिकू उत्पादकांना बाजारपेठ मिळण्याबरोबरच ग्रामीण पर्यटनाचा मोठा विकास होण्यास मदत होणार असून ग्रामीण विकासाची चांगली संधी असल्याचं सावे यावेळी म्हणाले. या चिकू महोत्सवाबाबत अधिक माहिती जाणून घेऊयात आमच्या प्रतिनिधीकडून . . . . .

**पालघर जिल्ह्यातल्या बोर्डी समुद्र किनारी दोन दिवसीय चिकू महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या महोत्सवात चिकू फळे, चिकू पासून तयार केलेले विविध पदार्थ, ग्रामीण हस्तकला, वारली चित्रकला यासारख्या खरेदीच्या संधी पर्यटकांना मिळणार आहे. चिकू फळाला मिळालेले GI मानांकन, ODOP एक जिल्हा, एक उत्पादन अंतर्गत पालघर जिल्यातले निवड झालेले चिकू, वारली चित्रकला, सातपाटीचे सिल्व्हर पापलेट आणि घोलवड गावाला खादी ग्रामोद्योग आयोगाने मधाचं गाव म्हणून दिलेली ओळख या पाश्र्वभूमीवर यंदा हा 11 वा चिकू महोत्सव साजरा करण्यात येत आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी पालघर हून नीता चौरे.**

**'उल्हास' मेळावा**

डॉक्टर कलामांसारखा आदर्श विद्यार्थी घडवायचा असेल, तर नाक्यावर राजकारणापेक्षा शिक्षणावर चर्चा झाली पाहिजे. विद्यार्थी पालकांपेक्षाही शिक्षकाचं जास्त ऐकत असतात. त्यामुळे गुरू-शिष्य परंपरेला बाधा येता कामा नये. समाजाचा, विद्यार्थ्यांचा शिक्षकांवरचा विश्वास अबाधित राहिला पाहिजे,' असं प्रतिपादन रत्नागिरीचे पालक मंत्री डॉ. उदय सामंत यांनी काल केलं. रत्नागिरी जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था, तसचं जिल्हा परिषद शिक्षण विभागा तर्फे आयोजित जिल्हा स्तरी य 'उल्हास' मेळाव्याचं उद्घाटन सामंत यांच्या हस्ते झालं त्या वेळी ते बोलत होते.

**नीट**

नीट-युजी वैद्यकीय प्रवेश परीक्षा ये त्या 4 मे रोजी घेण्यात येणार असल्याचं एन टी ए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं म्हटलं आहे. या परीक्षेसाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली असून ती 7 मार्चपर्यंत चालणार आहे.

**साखर गाळप**

राज्यात 199 साखर कारखान्यांचे 635 लाख मेट्रिक टन  ऊस गाळप झाले असून 576 लाख क्विंटल साखर तयार झाली आहे. राज्यातील साखर कारखान्यांचा साखर उतारा 9.07 टक्के राहीला आहे.

**खते**

कोल्हापूर जिल्ह्यात रब्बी हंगामासाठी पुरेसा खत साठा उपलब्ध असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मोहीम अधिकारी सुशांत लव्हटे यांनी दिली आहे.दरम्यान जिल्ह्याचा 2025-26 या आर्थिक वर्षाचा 940 कोटीचा आराखडा राज्य शासनास सादर करण्यात आला आहे. राज्य शासनाने जिल्ह्याकरता 518 कोटीचे नियोजन दिले होते.

**साहित्य आणि संस्कृती**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि शब्दगंध साहित्यिक परिषदेच्यावतीने सोळावे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन अहिल्यानगर इथं ज्येष्ठ साहित्यिक डॉ.संजीवनी तडेगावंकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू आहे. आज या संमेलनाचा समारोप होणार असून काव्य संमेलन, शाहिरी जलसा,अभिजात मराठी भाषा : साहित्यिकांची जबाबदारी या विषयावर  परिसंवाद होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आजची पिढी या विषयावर चर्चा सत्र होणार आहे.

**आनंदवन**

बाबा आमटे आणि साधनाताई आमटे यांच्या रूपाने आपण सर्वांनी देव पाहिला आहे असं प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश भूषण गवई यांनी केलं आहे. बाबा आमटे यांच्या आनंदवन प्रकल्पाला 75 वर्षे पूर्ण होत असून या निमित्ताने चंद्रपूर जिल्ह्यातल्या आनंदवन येथे 2 दिवसीय आनंदवन मित्रमेळाव्याचे आयोजित करण्यात आले आहे. त्यावेळी ते बोलत होते.

**महसूल क्रीडा**

सातारा इथं पुणे महसूल क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आलं आहे. सार्वजकनिक बांधकाम मंत्री  शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते या स्पर्धेचं उद्घाटन करण्यात आलं.  महसूल विभाग हा शासनाचा कणा असून वाढत्या कामांमुळे आलेला ताण-तणाव कमी करण्यासाठी  या क्रीडा स्पर्धा महत्त्वाच्या असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**सोयाबीन**

सोयाबीन खरेदीचा प्रश्न राज्य सरकार पेक्षा केंद्र सरकार मिटवू शकेल अशी प्रतिक्रिया राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी काल लातूरमध्ये दिली. सोयाबीनचे भाव वाढवायचे असतील तर सोयाबीनची पेंड भारताबाहेर निर्यात करणे गरजेचे असल्याचं पटेल यांनी यावेळी सांगितलं.

**अपघात**

बुलडाणा जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या अपघातात 3 जण ठार तर 1 जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. काल मलकापूर जवळ उमाळी येथे दुचाकीच्या अपघातात  दोन तर खामगाव नजीक टेंभुर्णा येथे एका वाहनाने मागून धडक दिल्याने दुचाकीवरील एक जण जागीच ठार झाला आहे.

**अंमली पदार्थ**

पालघर जिल्ह्यातल्या बोईसर मध्ये 2 कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीचे मेफेड्रोन अंमलीपदार्थ जप्त करण्यात आले आहेत. 29 वर्षीय अमान नईम मुराद हा आरोपी अंमलीपदार्थ बनवत असताना आढळून आला. या प्रकरणात आरोपी अटक करून त्याच्या विरुद्ध बोईसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**करजगी**

जत तालुक्यातील करजगी येथील बालिका अत्याचार प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवून आरोपीला फाशीची शिक्षा मिळण्यासाठी पाठपुरावा करू. पीडितेच्या कुटुंबियांना मनोधैर्य योजना आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत देऊ, असं प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी केलं आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर उमदी इथं घटनेचा आढावा घेतल्यानंतर त्या बोलत होत्या.

**निधन**

ज्येष्ठ पत्रकार, पंढरीनाथ सावंत यांच्या पार्थिव देहावर काल अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचं काल पहाटे मुंबईत राहत्या घरी निधन झालं. ते 90 वर्षांचे होते. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय मंत्रालय यांचा लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्कार, मुंबई मराठी पत्रकार संघाचा पुढारीकार ग . गो. जाधव पुरस्कार तसेच मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचा कृ. पां. सामक जीवनगौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले होते. प्रबोधनकार ठाकरे यांच्या समग्र वाङ्मयाचं संपादन त्यांनी केलं होतं. 'गिरणगावचा पंढरी' आणि 'पत्रकारपंढरी' ही त्यांची आत्मचरित्रं विशेष गाजली. निर्भिडता आणि व्यासंग असलेले, मराठी पत्रकारितेतील मार्गदर्शक असे व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सावंत यांना श्रद्धांजली वाहिली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी सावंत यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यात आज कटकमधील बाराबती स्टेडियमवर तीन सामन्यांच्या मालिकेतील दुसरा मर्यादित षटकांचा एकदिवसीय सामना होणार आहे. दुपारी दीड वाजता हा सामना सुरु होणार आहे. भारत या मालिकेत 1-0 आघाडीवर आहे. विराट कोहली गुडघ्याच्या दुखापतीतून बरा झाला असून आजचा सामना खेळण्यासाठी तो तंदुरुस्त आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**